# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

### मराठी विभाग

## संस्कारक्षम समाज निर्माण करण्याची गरज : डॉ. जरे

### राजगुरू महाविद्यालयात जागर जाणिवा अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

महिला सक्षमीकरणासाठी संस्कारक्षम समाज निर्माण करण्याची गरज असून त्यासाठी पालकांनी मुलांच्या मनावर सर्व वयोगटांतील स्त्रियांबद्दल आदर निर्माण करण्याचा संस्कार करायला हवा, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात रविवारी (दि. ८) जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. जरे बोलत होते. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, डॉ. एस. बी. पाटील, प्रा. जी. एल. भोर, प्रा. किशोर लांडे पाटील, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. रूपाली वायाळ, प्रा. नीता डोंगरे, प्रा. पी. यू. तापकीर, प्रा. पी. पी. ओसवाल उपस्थित होते.



हुतात्मा राजगुरुनगर महाविद्यालयात महिला दिनानिमित्त मनोगत व्यक्त करताना विद्यार्थिनी.

प्राचार्य डॉ. जरे म्हणाले, 'स्त्रीस्वातंत्र्य म्हणजे पुरुषांसारखे वागायला मिळणे नव्हे, तर स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्त्रियांनी जगायला शिकायला हवे. त्यांनी स्वतःचा आवाज न विसरता सुदृढ, सुशिक्षित, सुजाण व स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करायला हवा.'

महाविद्यालयात जागर जाणिवा अभियानांतर्गत मराठी विभागाच्या वतीने २ ते ८ मार्चदरम्यान काळाच्या पुढे असणाऱ्या स्त्रियांच्या कर्तृत्वावर आधारित परिसंवाद, 'उंच माझा झोका' विषयावर मनोगत, 'मला काही सांगायचंय' विषयावर स्वगत, 'माझी आई : माझी प्रेरणा' या विषयावर निबंधस्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले गेले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना स्त्रीसन्मान व स्त्रीजन्माचे स्वागत करण्याची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमात निर्भया प्रकरणापासून तर हिंगणघाटपर्यंत झालेल्या घटनांचा निषेध करण्यात आला.

शिवाय विद्यार्थिनी कल्याण मंडळांतर्गत डॉ. नीलम गायकवाड यांनी 'संतुलित आहार'; तर रमेशकुमार सोनवणे यांनी 'स्वसंरक्षण' विषयावर मार्गदर्शन केले. ग्रंथालय विभागाच्या वतीने स्त्रीवादी साहित्यावर आधारित ग्रंथप्रदर्शन व या ग्रंथांचे सामूहिक वाचन करण्यात आले. अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून नारीशक्तीचा सन्मान करीत महिलादिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. प्रतिमा लोणारी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनुसे व डॉ. एम. यू. बोऱ्हाडे यांनी केले. प्रा. एम. एल. मुळूक यांनी आभार मानले.

[redacted]

लोकमत

### एच. एम. जरे : राजगुरू महाविद्यालयात 'जागर-जाणिवा' अभियानांतर्गत विविध उपक्रम

# महिला सक्षमीकरणासाठी संस्कारक्षम समाज हवा

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** महिला सक्षमीकरणासाठी संस्कारक्षम समाज निर्माण करण्याची गरज असून, त्यासाठी पालकांनी मुलांच्या मनावर सर्व वयोगटांतील स्त्रियांबद्दल आदर निर्माण करण्याचा संस्कार करायला हवा, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात जागतिक महिलादिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, डॉ. एस. बी. पाटील, प्रा. जी. एल. भोर, प्रा. किशोर लांडे-पाटील, प्रा. दिलीप मुळुक, प्रा. रुपाली वायाळ प्रा. नीता डोंगरे, प्रा. पी. यू. तापकीर, प्रा. पी. पी. ओसवाल उपस्थित होते.



महाविद्यालयात स्त्रीसन्मान व स्त्रीजन्माच्या शपथेचे वाचन करण्यात आले.

डॉ. जरे म्हणाले, की स्त्री स्वातंत्र्य म्हणजे पुरुषांसारखे वागायला मिळणे नव्हे, तर स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्त्रियांनी जगायला शिकायला हवे. त्यांनी स्वत:चा आवाज न विसरता सुदृढ, सुशिक्षित, सुजान व स्वावलंबी बनायचा प्रयत्न करायला हवा, असे त्यांनी सांगितले.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी महिला दिन हा स्त्रीत्वाचा उत्सव असून, महिलांच्या अस्तित्वाची आणि शोषणाची जाणीव करून देणारा हा दिवस असल्याचे सांगितले.

महाविद्यालयात 'जागर-जाणिवा' अभियानांतर्गत मराठी विभागाच्या वतीने स्त्रियांच्या कर्तृत्वावर आधारित परिसंवाद, 'उंच माझा झोका' या विषयावर मनोगत, 'मला काही सांगायचंय' या विषयावर स्वगत, 'माझी आई : माझी प्रेरणा' या विषयावर निबंध स्पर्धा आणि मराठी साहित्यातील नामवंत कवयित्रींच्या कवितांचे सादरीकरण अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले.

यात कोमल गायकवाड, मानसी रेटवडे, संचिता मोरे, हर्षदा आल्हाट, मोहिनी पाटोळे, श्रुती वाडेकर, नम्रता बेल्हेकर, आकांशा भगत, गौरी सुतार या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. उपस्थित विद्यार्थ्यांना स्त्री सन्मानाची व स्त्रीजन्माचे स्वागत करण्याची शपथ दिली. या कार्यक्रमात निर्भया प्रकरणापासून हिंगणघाटपर्यंत झालेल्या अनेक घटनांचा निषेध केला.

Hello Pune Gramin
Page No. 5 Mar 13, 2020
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख